न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 03 एप्रिल 2026 | पान- 1

# सव्वासहा लाख नागरिकांनी भरला मिळकतकर

## पिंपरी महापालिका कर संकलन व कर आकारणी विभागाला 2025-26 आर्थिक वर्षात 947 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका कर संकलन व कर आकारणी विभागाला २०२५-२६ आर्थिक वर्षात ९४७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. शहरातील सात लाख ३२ हजारांपैकी सहा लाख २७ हजार ७९० मिळकतधारकांनी करभरणा केला आहे.

थकबाकीदारांवर जप्ती, नळजोड तोडणे, नावे प्रसिद्ध करण्याची कारवाई केली. जाहिरातींद्वारे जागृती केली. मार्चमध्ये 'अभय' योजना राबवली. त्याला ८३ हजार ४७० थकबाकीदारांनी लाभ घेऊन १९७ कोटी १८ लाख रुपयांचा कर भरला. त्यांना ४५ कोटी १३ लाख रुपयांची सवलत मिळाली

मार्च महिन्यात राबविण्यात आलेल्या 'अभय' योजनेला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला. सुमारे ८३ हजार ४७० थकबाकीदारांनी या योजनेचा लाभ घेत १९७ कोटी १८ लाख रुपयांचा कर भरला. या योजनेअंतर्गत नागरिकांना ४५ कोटी १३ लाख रुपयांची सवलत देण्यात आली. त्यामुळे थकबाकी कमी होण्यास मदत झाली असून, महापालिकेच्या महसुलातही मोठी भर पडली आहे.



### कर भरलेल्या मिळकती

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| » निवासी | - | ५,५२,०४२ | » बिगरनिवासी | - | ५२,२११ |
| » मिश्र | - | १३,६७४ | » मोकळ्या जमिनी | - | ५,०४९ |
| » औद्योगिक | - | ४,७८३ | » इतर | - | ३१ |

### अशी झाली वसुली (कोटी रुपयांत)

| » भरणा प्रकार | - | रक्कम |
|---|---|---|
| » ऑनलाइन | - | ७०६.७२ |
| » रोख | - | ८३.८८ |
| » धनादेशाद्वारे | - | ११०.५२ |
| » ईडीसी | - | ००.०६ |
| » डीडी | - | ०७.०९ |

> कर संकलन विभागाच्या नियोजनबद्ध कामकाजामुळे आणि नागरिकांना उपलब्ध करून दिलेल्या सुलभ सुविधांमुळे कर वसुलीत लक्षणीय वाढ झाली आहे.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, महापालिका

# पिंपरीत सिध्दयोगी माऊली महाराज वाळुंजकर यांचा 101 वा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात संपन्न

## पिंपरीत हजारो भक्तांची उपस्थिती; कीर्तन, अभंगवाणी आणि सामाजिक उपक्रमांनी कार्यक्रमाला रंगत

**पिंपरी | प्रतिनिधी**

सिध्दयोगी गुरुवर्य सद्गुरुनाथ श्री माऊली महाराज वाळुंजकर यांचा १०१ वा अभिष्टचिंतन सोहळा पिंपरी गावातील नवमहाराष्ट्र विद्यालय मैदान येथे १ एप्रिल २०२६ रोजी भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने भक्तगण, शिष्य परिवार व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी बोलताना माऊली महाराज वाळुंजकर यांनी परमपूज्य परमहंस श्री भालचंद्र महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने लाभलेले आयुष्य लोककल्याणासाठी अर्पण केल्याचे सांगितले. यामुळे आत्मिक समाधान लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



कार्यक्रमात ह.भ.प. बाळकृष्ण महाराज वसंत गडकर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. 'बाबा अहंकार निशी घनदाट | गुरु वचनी फुटली पहाट...' या अभंगावर आधारित कीर्तनाने उपस्थितांना अध्यात्मिक संदेश दिला. तसेच ह.भ.प. पूनमताई नळकांडे यांचा अभंगवाणीचा कार्यक्रमही पार पडला. समाजप्रबोधन करताना माऊली महाराजांनी सध्याच्या बुवाबाजी व भपकेगिरीपासून सावध राहण्याचे आवाहन केले. "गुरु स्वीकारताना तो आत्मज्ञानी, राजयोगी व ब्रह्मानंदात विलीन आहे का, याची खात्री करूनच त्याला शरण जावे," असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

या सोहळ्यानिमित्त विविध सामाजिक उपक्रमही राबविण्यात आले. सलग दोन दिवस आयोजित रक्तदान शिबिरात सुमारे १५० जणांनी रक्तदान केले. होम-हवन करण्यात आले तसेच गुरुवर्य जय बाबांची फळांनी तुला करण्यात आली. यानंतर माऊली महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमादरम्यान सुमारे ५ हजारांहून अधिक भक्तांना अन्नप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल (नाना) काटे, दत्तात्रय वाघेरे, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे, पीसीएमटीचे माजी चेअरमन संतोष कुदळे, माजी नगरसेवक रंगनाथ कुदळे, नगरसेविका प्रियंका कुदळे, माजी शिक्षण मंडळ सभापती श्रीरंग शिंदे, माजी नगरसेविका मीनाताई नानेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय तरटे, अभिजित वाघेरे आणि वैष्णवी राऊत यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भालचंद्र महाराज आश्रम कणकवली, सोहम सिद्ध दत्त व भालचंद्र महाराज आश्रम वाघोली तसेच विविध क्षेत्रांतील भक्तगण व शिष्य परिवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पिंपरी-चिंचवड आरटीओमध्ये मनुष्यबळाचा तुटवडा

## दर्जा वाढला पण सेवा संथ; 23 पदे रिक्त असल्याने कामकाजावर परिणाम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा दर्जा वाढवून त्याचे प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) करण्यात आले; मात्र अपुऱ्या मनुष्यबळामुळे या निर्णयाचा अपेक्षित फायदा नागरिकांना अद्याप मिळत नाही. नागरिकांना विविध कामांसाठी दोन ते तीन दिवसांची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे दर्जा वाढवला, मात्र कामाचे काय, असा प्रश्न येथे कामानिमित्त येणारे नागरिक उपस्थित करत आहेत.

शासनाने जुलै 2023 मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाला प्रादेशिक दर्जा देण्यात आला. या निर्णयामुळे कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मोठी वाढ झाली. जुन्नर, आंबेगाव, मावळ आणि पिंपरी-चिंचवड या विस्तृत भागाचा समावेश या कार्यालयाच्या अखत्यारित करण्यात आला. दर्जा वाढल्यानंतर कार्यालयासाठी एकूण 118 पदांना मंजुरी देण्यात आली. मात्र प्रत्यक्षात केवळ 95 पदांवर कर्मचारी कार्यरत आहेत.




त्यामुळे सुमारे 23 पदे अद्याप रिक्त आहेत. या रिक्त पदांमुळे कार्यालयीन कामकाजावर परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

पिंपरी-चिंचवड परिसरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पुणे-मुंबई महामार्ग, पुणे-बंगळूर द्रुतगती मार्ग - जुना पुणे-मुंबई महामार्गावर वाहन तपासणी, कारवाई आणि दंड वसुली यासाठी मोटार वाहन निरीक्षकांची आवश्यकता असते. मात्र निरीक्षकांची संख्या कमी असल्यामुळे तपासणी मोहीम राबविण्यास अडचणी निर्माण होतात. सर्वात जास्त रिक्त पदे ही मोटार वाहन निरीक्षकांची आहेत. ही पदे प्रत्यक्ष कामकाजासाठी अत्यंत महत्त्वाची असतात.

आरटीओचा दर्जा वाढवणे हा निश्चितच सकारात्मक निर्णय आहे. मात्र, त्यानुसार आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे तितकेच महत्त्वाचे आहे. वाढत्या कामाच्या ओझ्यामुळे प्रशासन आणि नागरिक दोघांनाही अडचणींचा सामना करावा लागणार आहे. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे आरटीओचे कामकाज संथ गतीने सुरू आहे.

मंजूर पदे : 40 भरलेली पदे : 24 रिक्त पदे : 16 कार्यालयात काही पदे पूर्णपणे भरलेली आहेत. त्यामध्ये लेखाधिकारी, वरिष्ठ लिपिक, कामगार मात्र ही पदे सहाय्यक स्वरूपाची असल्याने मुख्य कामकाजावर त्यांचा मर्यादित प्रभाव असतो.

वाहन परवाना काढणे, वाहन नोंदणी प्रमाणपत्र, वाहन मालकी हस्तांतरण, वाहन कर भरणा, वाहन फिटनेस प्रमाणपत्र, दंड (चालान) भरणा अशी विविध कामे असतात; मात्र कर्मचारी संख्या अपुरी असल्याने या कामांसाठी नागरिकांना कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात.

### वाहन तपासणी आणि कारवाईवर परिणाम

» पिंपरी-चिंचवड परिसरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पुणे-मुंबई महामार्ग, पुणे-बंगळूर द्रुतगती मार्ग - जुना पुणे-मुंबई महामार्गावर वाहन तपासणी, कारवाई आणि दंड वसुली यासाठी मोटार वाहन निरीक्षकांची आवश्यकता असते. मात्र निरीक्षकांची संख्या कमी असल्यामुळे तपासणी मोहीम राबविण्यास अडचणी निर्माण होतात.

### नागरिकांना होतोय त्रास

» आरटीओ कार्यालयात दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक विविध कामांसाठी येत असतात. यामध्ये वाहन परवाना काढणे, वाहन नोंदणी प्रमाणपत्र, वाहन मालकी हस्तांतरण, वाहन कर भरणा, वाहन फिटनेस प्रमाणपत्र, दंड (चालान) भरणा अशी विविध कामे असतात; मात्र कर्मचारी संख्या अपुरी असल्याने या कामांसाठी नागरिकांना कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात.

### अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे काम संथगती

» पिंपरी-चिंचवड आरटीओचा दर्जा वाढवणे हा निश्चितच सकारात्मक निर्णय आहे. मात्र, त्यानुसार आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे तितकेच महत्त्वाचे आहे. वाढत्या कामाच्या ओझ्यामुळे प्रशासन आणि नागरिक दोघांनाही अडचणींचा सामना करावा लागणार आहे. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे आरटीओचे कामकाज संथ गतीने सुरू आहे.

# रहाटणी, तापकीरनगर परिसरात अनधिकृत बांधकामांवर महापालिकेची कारवाई

## 88.87 चौ.मी. अनधिकृत बांधकामांवर कारवाई; नियमभंग करणाऱ्यांना महापालिकेचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २७ मधील वृंदावन कॉलनी, रहाटणी तसेच तापकीर मळा चौक, तापकीर नगर, रहाटणी या परिसरांमध्ये अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान एकूण अंदाजे ८८.८७ चौरस मीटर क्षेत्रफळावरील अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली.

महापालिका प्रशासनाने शहरातील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी कठोर भूमिका घेतली असून, त्या अनुषंगाने ही कारवाई राबविण्यात आली. सदर कारवाई आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तर 'ग' क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात आली.





कारवाई दरम्यान उप अभियंता जयवंत रोकडे यांच्या समन्वयातून महापालिका धडक कारवाई पथकाने सक्रिय सहभाग नोंदविला. यामध्ये बीट निरीक्षक किरण पवार, विनोद बजबळकर, दिग्विजय घोटकुले व ज्ञानराज खंडाळे यांचा समावेश होता.

या मोहिमेसाठी आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रसामग्रीची योग्य ती उपलब्धता करण्यात आली होती. कारवाई दरम्यान एम.एस.एफ.चे १२ जवान, १ पोलिस कर्मचारी, महापालिकेचे ५ मजूर तसेच ठेकेदारामार्फत ४ मजूर उपस्थित होते. याशिवाय जेसीबी ब्रेकर १, ट्रॅक्टर ब्रेकर १ तसेच ४ हातोड्यांच्या सहाय्याने अनधिकृत बांधकामांचे निष्कासन करण्यात आले.

महापालिका प्रशासनाकडून शहरातील अनधिकृत बांधकामांविरुद्ध अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले असून, नागरिकांनी बांधकाम करताना नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

महापालिका प्रशासनाने शहरातील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी कठोर भूमिका घेतली असून, त्या अनुषंगाने ही कारवाई राबविण्यात आली. सदर कारवाई आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तर 'ग' क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात आली.

कारवाई दरम्यान उप अभियंता जयवंत रोकडे यांच्या समन्वयातून महापालिका धडक कारवाई पथकाने सक्रिय सहभाग नोंदविला. यामध्ये बीट निरीक्षक किरण पवार, विनोद बजबळकर, दिग्विजय घोटकुले व ज्ञानराज खंडाळे यांचा समावेश होता.

# तीन वर्षे जबाबदारी विकसकांचीच : आयुक्तांचा स्पष्ट इशारा

## पाणीपुरवठ्याबाबत सोसायट्यांचे होणार सर्वेक्षण; कोणत्या बिल्डरने किती पाणी दिले याची यादी लवकरच होणार प्रसिद्ध.

**पुणे | प्रतिनिधी**

समाविष्ट गावांमधील गृहनिर्माण सोसायट्यांना तीन वर्षे पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी पूर्णपणे संबंधित विकसकाचीच असल्याचे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी बुधवारी स्पष्ट केले. बांधकाम परवानगी देतानाच या गोष्टी स्पष्ट करून तसे लेखी हमीपत्र घेतले जाते. त्या आधारेच पूर्णत्त्वाचा दाखलाही दिला जातो, हे देखील राम यांनी स्पष्ट केले. त्यामुळे पाणीपुरवठ्याची संपूर्ण जबाबदारी पालिकेवर टाकता येणार नाही, हे देखील राम यांनी सांगितले.

पाणी पुरवठ्याची जबाबदारी निश्चित करण्यासाठी समाविष्ट गावांतील सोसायट्यांचे सविस्तर सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. कोणत्या सोसायट्यांना पालिका आणि कोणत्या ठिकाणी विकसक पाणी पुरवणार याची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. यामुळे पाणीपुरवठ्याबाबतच्या जबाबदाऱ्या निश्चित होतील असेही आयुक्तांनी सांगितले. हमीपत्र देतानाही विकसकांनी अनेक पळवाटा काढल्या आहेत. त्यामुळे ते जबाबदारी झटकत आहेत. हमीपत्रातील त्रुटी दूर करण्यासाठी पालिकेने पावले उचलली आहेत.

समाविष्ट गावातील पाण्याचा प्रश्न सोडवण्यावर पालिकेने लक्ष केंद्रीत केले असून, पुढील वर्षात सात गावांना थेट पालिका पाणी पुरविणार असल्याचे आयुक्त म्हणाले. पालिकेच्या समान पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू असले, तरी त्याची अंमलबजावणी पूर्ण क्षमतेने झालेली नाही. ८२ टाक्यांपैकी ४४ टाक्यांचे काम पूर्ण झाल्याचा दावा केला जातो. पाइपलाइनचे जाळे अपूर्ण असल्याने केवळ पाच ते सात टाक्यांमधूनच पाणीपुरवठा केला जातो. या योजनेचा आढावा घेऊन जुलै किंवा ऑगस्टपर्यंत १०० टक्के अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे आयुक्तांनी सांगितले. याबाबत मुख्यसभेतही चर्चा झाली होती.

समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत ८२ टाक्यांपैकी ४४ टाक्यांचे काम पूर्ण झाले असले तरी पाइपलाइन अपूर्ण आहे. जुलै-ऑगस्टपर्यंत ही योजना पूर्ण क्षमतेने राबवण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच हमीपत्रातील त्रुटी दूर करून विकसकांची जबाबदारी निश्चित करण्यावरही भर दिला जात आहे. समाविष्ट गावांमधील गृहनिर्माण सोसायट्यांना तीन वर्षे पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी पूर्णपणे संबंधित विकसकाचीच असल्याचे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी बुधवारी स्पष्ट केले. बांधकाम परवानगी देतानाच या गोष्टी स्पष्ट करून तसे लेखी हमीपत्र घेतले जाते. त्या आधारेच पूर्णत्त्वाचा दाखलाही दिला जातो, हे देखील राम यांनी स्पष्ट केले.




### पाणीप्रश्न सोडवण्यासाठी महापालिकेची पावले

» समाविष्ट गावांतील पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी महापालिका सक्रिय झाली असून, पुढील वर्षात सात गावांना थेट पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे. समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत ८२ टाक्यांपैकी ४४ टाक्यांचे काम पूर्ण झाले असले तरी पाइपलाइन अपूर्ण आहे. जुलै-ऑगस्टपर्यंत ही योजना पूर्ण क्षमतेने राबवण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच हमीपत्रातील त्रुटी दूर करून विकसकांची जबाबदारी निश्चित करण्यावरही भर दिला जात आहे.

### विकसकांची पाणीपुरवठा जबाबदारी स्पष्ट

» समाविष्ट गावांमधील गृहनिर्माण सोसायट्यांना पहिल्या तीन वर्षांसाठी पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी संबंधित विकसकांचीच असल्याचे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी स्पष्ट केले. बांधकाम परवानगी देताना विकसकांकडून लेखी हमीपत्र घेतले जाते आणि त्यानुसारच पूर्णत्वाचा दाखला दिला जातो. त्यामुळे पाणीपुरवठ्याची जबाबदारी पूर्णपणे महापालिकेवर टाकता येणार नाही. या पार्श्वभूमीवर जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यासाठी सविस्तर सर्वेक्षण हाती घेण्यात येणार आहे.

"पाण्याबाबतच्या सर्व समस्या सोडवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याबाबत प्रभागनिहाय माहिती घेतली जात आहे. समान पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेऊन जुलैअखेर ती पूर्ण क्षमतेने राबवली जाईल."

- नवल किशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका

# महसूल विभागाच्या सेवा रविवारी मध्यरात्रीपर्यंत बंद

## सातबारा, प्रॉपर्टी कार्डसह सर्व ऑनलाइन सुविधा बंद राहणार; 6 एप्रिलपासून सेवा पूर्ववत सुरू होणार

**पुणे | प्रतिनिधी**

सातबारा उतारे, मालमत्तापत्रिका (प्रॉपर्टी कार्ड), क प्रत, फेरफार, तसेच नोंदणी मुद्रांक विभागाशी संबंधित महसूल तसेच 'जी टू बी ऑनलाइन सेवा' आज, गुरुवारपासून (२ एप्रिल) रविवारी (५ एप्रिल) रात्री बारा वाजेपर्यंत बंद राहणार असून, सोमवारपासून (६ एप्रिल) या सेवा पूर्ववत सुरू होणार आहेत.

संगणक प्रणाली आणि ऑनलाइन सेवा देखभाल तसेच दुरुस्तीच्या कामासाठी तात्पुरत्या स्वरुपात आजपासून (गुरुवार) बंद ठेवण्यात येणार आहेत. या संदर्भात भूमी अभिलेख विभागाचे संचालक शैलेश नवाल यांनी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध केली आहे.

या सेवांचा वापर नागरिक, बँका, तसेच विविध शासकीय व खासगी संस्थांकडून मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे या चार दिवसांत संबंधित कामांसाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, ६ एप्रिलपासून सर्व सेवा पूर्ववत सुरू होणार असल्याचे भूमी अभिलेख विभागाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी याची नोंद घेऊन आवश्यक कामांचे नियोजन करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. 'भूमी अभिलेख विभागाच्यावतीने विविध प्रकारच्या ऑनलाइन सेवा देण्यात येतात. त्या सेवांचा नागरिकांसह संस्था, बँका, इतर सरकारी विभागांना त्या सेवांचा फायदा होतो. त्यामध्ये भूमी अभिलेख, महाभूमी पोर्टलच्या माध्यमातून डिजिटल स्वाक्षरी असलेले आणि केवळ पाहण्यापुरते उपलब्ध असलेल्या सातबारा, प्रॉपर्टी कार्ड, क प्रत, फेरफार तसेच नोंदणी मुद्रांक विभागाशी काही महसूल सेवा आणि 'जी टू बी पोर्टल' वरील सर्व सेवा बंद राहणार आहेत. भूमी अभिलेख तसेच महसूल विभागाच्या सर्व सेवा देणाऱ्या संगणक प्रणाली आणि ऑनलाइन सेवा देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी तात्पुरत्या स्वरुपात आजपासून (गुरुवार) बंद ठेवण्यात येणार आहेत,' असे नवाल यांनी म्हटले आहे.




### महाभूमी सेवा बंद

» भूमी अभिलेख विभागाच्या संगणक प्रणालीच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामामुळे २ एप्रिल ते ५ एप्रिलदरम्यान महाभूमी पोर्टलवरील सर्व ऑनलाइन सेवा तात्पुरत्या बंद राहणार आहेत. यामध्ये सातबारा उतारे, प्रॉपर्टी कार्ड, क प्रत, फेरफार तसेच नोंदणी मुद्रांक विभागाशी संबंधित सेवा आणि 'जी टू बी' पोर्टलवरील सुविधा यांचा समावेश आहे. या कालावधीत नागरिक, बँका आणि इतर संस्थांना या सेवांचा लाभ घेता येणार नाही. मात्र, ६ एप्रिलपासून सर्व सेवा पूर्ववत सुरू होणार असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

# आरोग्य विभागात पाच हजार कर्मचाऱ्यांची भरती! आरोग्यमंत्र्यांची मोठी घोषणा

## ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ या मोहिमेच्या विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी आरोग्यमंत्र्यांनी संवाद साधला.

**पुणे | प्रतिनिधी**

जनतेला आरोग्य सेवा देण्यासाठी राज्यात मोठ्या पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात आली आहे. राज्यात अनेक सरकारी रुग्णालये बांधून तयार आहेत. मनुष्यबळाचा प्रश्न असल्याने या आरोग्य सुविधा सुरू करता येत नाहीत. त्यामुळे आरोग्य विभागात पाच हजार कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे. ही प्रक्रिया पुढील दीड महिन्यात सुरू होईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ या मोहिमेच्या विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी आरोग्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते. आरोग्यमंत्री म्हणाले, की आरोग्य विभागाकडून पायाभूत सुविधांच्या उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. अनेक ठिकाणी आरोग्य सुविधा बांधून तयार आहेत. त्या सुरू करण्यात केवळ मनुष्यबळाचा प्रश्न आहे. आरोग्य विभागात पाच हजार कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे. या पदांच्या मान्यतेचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीसमोर मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. त्यावर पुढील आठवड्यात बैठक अपेक्षित आहे. या पदांच्या भरतीला मंजुरी मिळाल्यानंतर महिना ते दीड महिन्यात भरतीची प्रक्रिया सुरू होईल.

शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या माध्यमातून मुख्यमंत्र्यांनी शहरांच्या आरोग्याची संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे दिली आहे. आधी महापालिकांमध्ये ही सेवा विभागलेली होती. संसर्गजन्य आजार प्रतिबंधक कार्यक्रम आणि इतर अभियाने राबविण्यात त्यामुळे अडचणी येत होत्या. शहरी आरोग्य आयुक्तालयाचे काम जिल्हा परिषदांतील आरोग्य विभागाच्या धर्तीवर चालेल. हे आयुक्तालय महापालिकांच्या आरोग्य सेवांवर बारकाईने देखरेख ठेवेल. याचबरोबर आरोग्य मोहिमांच्या अंमलबजावणीला गती देईल. या आयुक्तालयाची आस्थापना आणि इतर बाबींवर सध्या काम सुरू आहे, असेही आरोग्यमंत्र्यांनी नमूद केले. आरोग्य विभागात पाच हजार कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे. ही प्रक्रिया पुढील दीड महिन्यात सुरू होईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.



### सरकारी योजना लागू कराव्यात

» महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत योजना एकत्रितपणे राज्यात राबविण्यात येत आहेत. या योजना जास्तीत जास्त रुग्णालयांमध्ये लागू करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. धर्मादाय आणि खासगी रुग्णालयांमध्ये योजना लागू करण्याचा आदेश देण्यात आला; परंतु, काही रुग्णालयांनी याबाबत न्यायालयात याचिका दाखल केली. धर्मादाय रुग्णालयांमध्ये योजना लागू व्हावी म्हणून सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन दिले जात नसल्याच्या तक्रारी आहेत. अशा प्रकरणांत संबंधित कंत्राटदार किंवा कंपन्यांना काळ्या यादीत टाकणार असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### आरोग्य सेवांसाठी भरतीचा निर्णय

» राज्यातील नागरिकांना अधिक सक्षम आरोग्य सेवा देण्यासाठी सरकारकडून महत्त्वाचे पाऊल उचलण्यात येत आहे. अनेक ठिकाणी आधुनिक सरकारी रुग्णालये तयार असली तरी मनुष्यबळाअभावी सेवा सुरू होऊ शकलेल्या नाहीत. ही अडचण दूर करण्यासाठी आरोग्य विभागात सुमारे 5 हजार कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येणार आहे. यासाठीचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीकडे पाठविण्यात आला असून, मंजुरीनंतर पुढील एक ते दीड महिन्यात भरती प्रक्रिया सुरू होईल. या निर्णयामुळे राज्यातील आरोग्य सेवांना मोठी चालना मिळणार आहे.

“ राज्यात सहा नवीन कर्करोग रुग्णालये मंजूर आहेत. या रुग्णालयांसाठी आशियाई विकास बँकेकडून निधी उपलब्ध झाला आहे. त्यातील एक कर्करोग रुग्णालय पुण्यात करण्याचा प्रस्ताव असून, ते विभागीय स्तरावरील असेल.

- प्रकाश आबिटकर, आरोग्यमंत्री

# मांजरीत पाणीटंचाईवर महिलांचे बेमुदत आंदोलन

## मोफत नळजोड, कचरा व आरोग्य विविध सुविधांसाठी नागरिकांचा आक्रोश

**पुणे | प्रतिनिधी**

झोपडपट्टीमधील मागासवर्गीय कुटुंबांना मोफत नळजोड व पुरेशा पाणीपुरवठ्यासह विविध मागण्यांसाठी येथील अखिल मांजराईनगर नागरिक कृती समितीच्या वतीने हजरत राजा मोगल मंदिरासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. 116 व 72 घरकुल वसाहतीमधील प्रत्येक घरातील महिला या आंदोलनात सहभागी झाल्या आहेत.

राज्य सरकारने येथील मागासवर्गीय कुटुंबांसाठी पंचेचाळीस वर्षांपूर्वी 116, तर बत्तीस वर्षांपूर्वी 72 कुटुंबांसाठी घरकुल योजना राबवून त्यांना घरे निर्माण करून दिली आहेत. मात्र, पुरेशा सुविधा मिळत नसल्याने येथील नागरिकांना पालिकेच्या समावेशानंतर साडेचार वर्षांनीही विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्या विरोधात हे आंदोलन सुरू केले असून, आंदोलनाचा हा सातवा दिवस आहे.

झोपडपट्टीमधील मागासवर्गीय कुटुंबांना मोफत नळजोड व पुरेशा पाणीपुरवठ्यासह विविध मागण्यांसाठी येथील अखिल मांजराईनगर नागरिक कृती समितीच्या वतीने हजरत राजा मोगल मंदिरासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. सध्या या भागात पुरेसे पाणी मिळत नाही, पाणी सोडणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून मनमानी केली जाते. इतर अनेक ठिकाणी उघडे नळ असल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाते. नळजोडसाठी पैसे मागितले जातात. वेळेवर कचरा उचलला जात नाही. झोपडपट्टी शेजारून वाहणाऱ्या नदीत जलपर्णी वाढली आहे. त्यातून डासांची उत्पत्ती होऊन येथील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, अशा तक्रारी येथील महिला सुनीता ढेकणे, पारू भंडारी, संगीता लोखंडे, मीना खरात, सावित्रा सावंत, कल्याणी जगताप, मलिका सोनवणे, उल्का चव्हाण, सुरेखा चव्हाण, कविता जाधव, भारती भंडारी, बुद्धक भोसले, प्रकाश ढेकणे, गंगाराम खरात, मोहन लोखंडे, किशोर टाकळे यांनी केली आहे.



“ आम्ही पाणीपुरवठा विभागाच्या वतीने आंदोलकांची भेट घेऊन या वस्तीसाठी पुरेसा पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने काम सुरू केले आहे. सुमारे दोनशे मीटर वितरिकेचे काम झाले आहे. तीन व्हॉल्व्ह बसविले आहेत. येत्या आठ दिवसांत हे काम पूर्ण होईल. गलिच्छ वस्ती निर्मूलन विभागाचा अभिप्राय आल्यानंतर या ठिकाणी घरगुती नळजोड देण्याबाबतचा निर्णय वरिष्ठ प्रशासकीय पातळीवर घेतला जाईल.

- शाहीदखान पठाण, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा विभाग, महापालिका